# अर्थशास्त्र
# बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## आधुनिक अधिकोषण पद्धती
## (Modern Banking System)

भारतात नरसिंहम समितीने केलेल्या शिफारशीनंतर म्हणजेच नोव्हेंबर १९९१ पासून बँकीग क्षेत्रात अनेक टप्प्यात सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणांमुळे बँकीग क्षेत्रात बँकांची कार्यपद्धती, बँकींग कायदे यात अनेक बदल घडून आले. बँकांची वाढत जाणारी थकबाकी कमी करण्यासाठी व त्यापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी बँकांनी आपली अनुत्पादित मालमत्ता जाहीर करावी असे धोरण आखण्यात आले. व त्या संदर्भात आवश्यक त्या आर्थिक तरतुदी करण्याचे बंधन बँकांवर घालण्यात आले.

**अनुत्पादित मालमत्ता (संपत्ती) (Non-performing Assets)-**

बँकांनी आपल्या ग्राहकांना दिलेल्या एकूण कर्जापैकी ज्या कर्जापासून बँकेला व्याजाच्या रुपाने उत्पन्न प्राप्त होऊ शकत नाही किंवा प्राप्त होण्याची शक्यता संपली आहे अशी बँकेजवळील कर्ज स्वरुपातील मालमत्ता म्हणजे 'अनुत्पादित मालमत्ता' होय. याला निष्क्रिय मालमत्ता असे देखील म्हणतात.

सर्वसाधारणपणे बँका आपल्याजवळील जमा झालेल्या ठेवी रोख स्वरुपात स्वत:जवळ न बाळगता जमा झालेल्या ठेवींच्याच आधारावर बँका गरजू व्यक्तींना कर्जाचा पुरवठा करते. बँकेत ठेवींच्या स्वरुपात पैसा जमा करुन ठेवीदार कमी व्याज मिळवित असतात. तर बँका याच ठेवी कर्ज रुपाने इतरांना देऊन अधिक दराने व्याज मिळवितात. या

कर्जाच्या व्यवहारातून प्राप्त होणारे व्याज हे बँकांच्या उत्पन्नाचे एक महत्वाचे साधन असते. जर या कर्जाची थकबाकी वाढत जाऊन कर्जावरील व्याज देखील प्राप्त होणे कठीण जाते. त्यामुळे अशा कर्जांचा समावेश अनुत्पादित संपत्तीमध्ये केला जातो. अशा संपत्तीचे प्रमाण वाढल्यास बँकेची वित्तीय स्थिती खालावली जाते व उत्पन्नात घट होते म्हणून अशा प्रकारची संपत्ती नेहमी कमी ठेवण्याचा प्रयत्न बँकांनी करणे अतिशय गरजेचे आहे.

**अनुत्पादित संपत्तीत वाढ होण्याची कारणे (Causes of Non-performing Assets)-**

अनुत्पादित संपत्तीत वाढ होण्याची कारणे पुढीलप्रमाणे

**१) कर्जाच्या परतफेडीकडे दुर्लक्ष -**

बँकांनी ग्राहकांना दिलेल्या कर्जाची वसूली ही ठरलेल्या रकमेनुसार टप्प्याने होत असते. ही वसुली ठरल्याप्रमाणे वेळोवेळी करुन घेणे अत्यंत आवश्यक असते. परंतु बँका याकडे दुर्लक्ष करतात.

**२) कर्जाच्या प्रस्तावाची योग्य पडताळणी -**

बऱ्याच वेळा बँका कर्जासाठी आलेल्या प्रस्तावाची योग्य पडताळणी करीत नाही. जसे, आलेल्या प्रस्तावात किती विश्वसनियता व सुरक्षितता आहे हे पडताळून पाहात नाही. त्यामुळे कर्जाची रक्कम थकीत होऊन अनुत्पादित संपत्तीत वाढ होत जाते.

**३) वसुली पथकाचा अभाव -**

बऱ्याच बँकाकडे कर्जाची वसुली करण्याकरीता आवश्यक असणारे योग्य पथक नसते. त्यामुळे कर्जाची वसुली वेळेवर होत नाही व अनुत्पादित संपत्तीत वाढ होत जाते.

**४) भांडवलाच्या आवश्यकतेच्या परिक्षणाचा अभाव -**

कर्जदाराने एखाद्या प्रकल्पाच्या उभारणीसाठी कर्जाची मागणी केल्यास त्या प्रकल्पासाठी किती भांडवलाची आवश्यकता आहे याचे परिक्षण बँकेने करणे गरजेचे आहे. त्याने केलेली कर्जाची मागणी ही त्याच्या आवश्यकतेपेक्षा जास्त आहे का? हे पाहण्याची आवश्यकता असते. परंतु याकडे बँका दुर्लक्ष करतात व त्यामुळे अनुत्पादित संपत्तीत वाढ होत जाते.

**५) संचालक मंडळ -**

बँकेच्या संचालक मंडळावरील संचालक आपल्या जवळच्या नातलगांना, मित्र मंडळींना कर्जपुरवठा करीत असतात. मात्र तो वसूल करतांना दिरंगाई करतात, त्यामुळे अनुत्पादित संपत्तीत मोठ्या प्रमाणात वाढ होत जाते.

**ई-बँकींग (Electronic Banking / E-Banking)-**

ई-बँकींगमुळे बँक व्यवसायात अमूलाग्र बदल घडून आले. ई-बँकींगमुळे बँकांच्या कार्यपद्धतीवर अनेक सकारात्मक परिणाम घडून आले आहे. ई-बँकींगमधील ई हे अक्षर इलेक्ट्रॉनिक बँकींग असे आहे. या व्यवहारात प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा वापर केला जातो. ई-बँकींगमध्ये प्रामुख्याने इंटरनेटचा वापर केला जातो. संगणीकृत असणारी बँक इंटरनेट द्वारा देशातील किंवा जगातील अन्य संगणकाशी जोडली जातात आणि बँक ग्राहक प्रत्यक्ष बँकेत न जाता स्वत:च्या संगणकावर आपल्या बँक खात्यावरील व्यवहार करु शकतो. यालाच ई-बँकींग किंवा इंटरनेट बँकींग म्हणतात. यामुळे बँक ही ग्राहकाच्या घरात पोहोचते. त्यामुळे देशातील कोणतीही व्यक्ती इंटरनेटद्वारा पैसे भरणे, पैशाचे हस्तांतरण करणे, यासारखे व्यवहार करु शकते. त्यामुळे आपल्या गरजेनुसार ग्राहक केव्हाही बँकेशी व्यवहार करु शकतो यामुळे ग्राहकाचा वेळ व शक्ती खर्च होत नाही.

## ई-बँकींगचे स्वरुप (Nature of E-Banking)-

ई-बँकींग म्हणजे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बँक व्यवहार करणे होय. वर्ल्ड वाईड वेब (W.W.W.) द्वारे सर्व्हर (मुख्य संगणक) इंटरकनेक्ट करुन एक संपर्क जाळे निर्माण केले जाते. ई-बँकींगमुळे कमीत कमी किमतीत व कमी वेळेत जास्तीत जास्त सेवा हे ई-बँकींगमुळे बँक व्यवसायाला साध्य होऊ शकले. ई-बँकींगमुळे ग्राहकाला बँकेशी संबंधीत असणारे सर्व व्यवहार आपल्या घरी बसून करता येतात. आज वित्तव्यवस्था व आर्थिक पद्धती यात अमूलाग्र बदल झाले आहेत. मानवी जीवनात एक प्रकारे आर्थिक उत्क्रांती झाली आहे. जर बँका जास्तीत जास्त इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करत नसतील तर त्या बँका अस्तित्वातच राहणार नाही.

## ई-बँकींगचे फायदे -

जगभरातील लाखो करोडो लोकांचा ई-बँकींग हा ई-कॉमर्सचा लोकप्रिय प्रकार आहे. आज इंटरनेटवर अनेक प्रकारची उत्पादने व सेवा पुरविल्या जातात. इंटरनेटवरुन ऑनलाईन व्यवहार करणे एक सुविधाजनक व्यवस्था बनली आहे. ई-बँकींगमुळे बँका लाखो ग्राहकांपर्यंत पोहोचल्या आहेत.

**ई-बँकींगच्या फायद्याचे दोन गटात वर्गीकरण केले जाते.**

१) ग्राहकांना होणारे फायदे

२) बँकांना होणारे फायदे

### १) ग्राहकांना होणारे फायदे

पारंपारिक बँकींग पद्धतीमध्ये बँकांच्या कामकाजाच्या वेळा ठरलेल्या असत व त्या वेळेतच कामकाज सुरु असायचे. आज ई-बँकींग ग्राहकांना २४ तास सेवा देत आठवड्याचे

सातही दिवस सातत्याने सुरु असते. यालाच ७x२४ योजना असे म्हणतात. इंटरनेट बँकींग खाते उघडण्यास आणि वापरण्यास सोपे आणि सुलभ असते. ग्राहकांना बँकेत जाऊन आपले व्यवहार पूर्ण होण्यासाठी वाट पाहाण्याची गरज नसते. बँका ग्राहकांना ई-बँकींग सेवा देण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारत नाही. बँक ग्राहक ई-मेलद्वारा बँकेला सुचना देऊन एका बँक शाखेतील रक्कम दुसऱ्या बँक शाखेतील खात्यात पैसे हस्तांतरीत करु शकतो. ई-बँकींगमुळे ग्राहकांना होणारा सर्वात मोठा फायदा म्हणजे विविध प्रकारच्या बिलाची देणी भागविणे होय. ई-बँकींगचा वापर करुन ग्राहक आपली विमा खाते, वीजबील, टेलीफोन बील, इत्यादी रकमा घरी बसल्या बसल्या बँकेला ई-मेलद्वारा सुचना देऊन भरु शकतो. थोडक्यात ई-बँकींग व्यवहारामुळे ग्राहकांची वेळ व श्रम यांची बचत होते.

### २) बँकांना होणारे फायदे

ई-बँकींगचे बँकांना पुढील फायदे होतात.

ई-बँकींग सुविधेमुळे बँका जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचल्यामुळे ग्राहकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ई-बँकींगमुळे बँकांच्या व्यवस्थापन खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होते. कारण बरीचशी कामे संगणकाच्या सहाय्याने पूर्ण केली जातात. सर्व मुलभूत कार्ये ई-बँकेद्वारा होत असल्याने कार्यातील शिथीलता कमी झाली आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी वर्गाची संख्या कमी असल्याने व्यवस्थापन खर्चही कमी होतो. ई-बँकींगमुळे व्यवहारात पारदर्शकता येते. त्यामुळे ग्राहकांशी उत्तम संबंध निर्माण होतात.

थोडक्यात ई-बँकींगमुळे बँका ग्राहकांच्या अत्यंत जवळ येतात. परिणामस्वरुप बँकींग व्यवहाराचा विकास होत आहे. ई-बँकींग व्यवहार अचूक व सुरक्षित होतात आणि बँकांच्या विकासास हातभार लावतात.

### ई-बँकींगचे तोटे

सर्वप्रथम ई-बँकींग सुविधा वापरण्यासाठी ग्राहकाला शैक्षणिक गुणवत्ता असायला हवी. कारण सुशिक्षित लोकच ई-बँकींग सुविधेचा लाभ घेऊ शकतात. अशिक्षीत ग्राहक या सुविधांचा फारसा लाभ घेऊ शकत नाही. ई-बँकींगचे व्यवहार हे पासवर्ड, कोडवर्डच्या माध्यमातून होतात. हे कोडवर्ड, पासवर्ड इतरांना माहित झाल्यास ती व्यक्ती या ग्राहकाच्या वैयक्तिक खात्यातून रक्कम काढण्याचा प्रयत्न करु शकते. ई-बँकींगसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. उदा. ATM मशीनचे यंत्र अत्यंत महाग असून बऱ्याच वेळा ते आयात करावे लागते. याच्या देखभालीचा खर्च ही मोठा असतो. ई-बँकींगचा सर्वात महत्वाचा दोष म्हणजे नेटवर्क डाऊन असणे. त्यामुळे बँकींग व्यवहारात अडथळे निर्माण होतात. त्याचप्रमाणे अंध, अपंग, वृद्ध इत्यादी व्यक्तींना ई-बँकींगचा लाभ घेता येत नाही.

### कोअर बँकिंग (Core Banking)-

जागतिकीकरणामुळे सर्व जग जवळ आले आहे. पूर्वी ज्याप्रमाणे बँका ठराविक क्षेत्रातच कार्यरत होत्या परंतु आज बँकांनी देशाच्या सीमा ओलांडल्या आहे. आज परदेशातही बँकांच्या शाखा आहेत. बँक व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बँकांना आपला विस्तार करणे सहज शक्य झाले आहे. पूर्वी ग्राहकाचे ज्या बँकेत खाते असेल त्याच बँकेतून त्याला व्यवहार करावे लागत. परंतु आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बँकेच्या कोणत्याही शाखेचा ग्राहक इतर कोणत्याही शाखेतून व्यवहार करु शकतो.

### कोअर बँकिंगचा अर्थ (Meaning of Core OR Centralized Online Realtime Exchange Banking)-

कोअर बँकिंग म्हणजे एखाद्या बँकेच्या संगणक जाळ्याने जोडलेल्या शाखांचा समूह देत असणाऱ्या बँक सेवा होय. कोअर बँकिंगमुळे ग्राहकांना त्यांच्या बँकेच्या कोणत्याही

शाखेमधून व्यवहार करणे शक्य होते. बँकेच्या सर्व शाखा ह्या मध्यवर्ती, माहिती केंद्राशी निगडीत असल्याने ह्याला 'गाभा बँकिंग' (Core Banking) असे म्हटले जाते. सर्व बँकांसाठी मध्यवर्ती माहिती केंद्र कार्यरत असल्याने केंद्रिय पातळीवर सर्व व्यवहार ऑनलाईन केले जातात. सामान्यत: अशा मध्यवर्ती केंद्रात बँकेच्या सर्व शाखा व त्यांच्या व्यवहाराच्या नोंदी असतात. कोअर बँकिंग प्रणालीचा स्विकार करतांना सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नेटवँकिंग यांचा वापर केला जातो. प्रथम दर्शनी कोअर बँकिंग म्हणजे पैसे जमा करणे आणि अदा करणे होय. अलीकडच्या काळात बहुतेक बँका त्यांच्या कार्यामध्ये कोअर बँकिंगचा उपयोग करतांना दिसतात. सर्वसाधारणपणे कोअर बँकिंग कार्यामध्ये ठेव खाते, कर्ज, गहाण आणि पैशाचे प्रदान अशा कार्यांचा समावेश होतो. बँका, ए.टी.एम., इंटरनेट बँकिंग आणि शाखांमार्फत अशा सेवा पुरवितात.

**कोअर बँकिंगचे फायदे (Merits of Core Banking)-**

१) बँकेच्या सर्व व्यवहारांचा परिणाम थेट बँकेच्या जनरल लेजर आणि नफा तोटा पत्रकावर होतो. बँकेच्या सर्व शाखांच्या व्यवहारांची माहिती एकाच ठिकाणी प्राप्त होऊ शकते. याचा फायदा आर्थिक / वित्तीय व्यवस्थापनाला वेळेवरच प्रभावी निर्णय घेण्यासाठी होतो.

२) कोअर बँकिंगमुळे बँकेला व्याज दरातील बदल, उत्पन्नातील बदल तसेच व्याजाचे उपयोजन इत्यादी एकाच ठिकाणाहून सर्व शाखांसाठी करता येते. त्यामुळे बँकेच्या व्यवहारात एकसूत्रता येते.

३) कोअर बँकिंगमुळे ग्राहक एखाद्या शाखेचा ग्राहक न राहता बँकेचा ग्राहक बनतो. एकाच खाते क्रमांकामुळे बँकेला ग्राहकाची खाती एकाच ठिकाणाहून पाहता येतात. त्यामुळे बँकेला ग्राहकाची माहिती, बँकेच्या व्यवसायासंदर्भात ग्राहकाचे वर्तन समजणे सोपे जाते.

४) कोअर बँकिंग प्रणालीमुळे सुरक्षितता व व्यवस्थापन सुरळीतपणे करता येते. एकाच ठिकाणी माहिती तंत्रज्ञान व व्यवस्थापन करावे लागते. त्यामुळे मनुष्यबळाची गरज कमी होते व खर्चातही कपात होते.

५) व्यापारी बँकांना रिझर्व्ह बँकेकडे सादर करावी लागणारी मालमत्ता व दायित्व, अनुत्पादित मालमत्ता अहवाल इत्यादी कोअर बँकिंगमुळे सुलभतेने तयार करता येतात.

६) कोअर बँकिंगमुळे तंत्रज्ञानावर आधारित सेवा पुरविल्या जातात. सरकारी व्यवहार प्रणाली, तारण कर्जे, ए.टी.एम., इंटरनेट बँकिंग इत्यादींशी कोअर बँकिंगचे एकात्मिकरण करणे सुलभ होते. त्यामुळे बँका कमी खर्चात उत्कृष्ट सेवा पुरवू शकतात.

७) ग्राहकाच्या खात्यामध्ये झालेल्या व्यवहाराचे मोबाईलवर संदेश पाठवून ग्राहकांना सतर्क केले जाते. या सेवेमुळे ग्राहकाला सुविधा व सुरक्षा प्राप्त होते.

८) कोअर बँकिंगमुळे माहितीचे अदान प्रदान लवकरात लवकर व कार्यक्षमतेने करता येते.

**कोअर बँकिंगचे तोटे (Demerits of Core Banking)-**

१) कोअर बँकिंगमुळे ए.टी.एम., धनादेश जमा करण्यासाठीचे यंत्र बसवावी लागतात. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जागा घेणे, वॉचमनची नेमणूक करणे इत्यादीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो.

२) कोअर बँकिंगमध्ये केंद्रीय यंत्रणा बसविलेली असते. जर या यंत्रणेत बिघाड झाला तर सर्वच व्यवहार ठप्प होतात आणि सर्व यंत्रणाच कोलमडून पडते.

३) परंपरागत पद्धतीने व्यवहार करणाऱ्या शाखांचे कोअर शाखेत रुपांतर करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. उदा.-आकडेवारी संग्रहीत करणे, माहितीचे नुतनीकरण करणे इत्यादी ही सर्व कामे मोठ्या खर्चाचे व त्रासाचे ठरते.

४) कोअर बँकिंग प्रणालीचे कामकाज गुंतागुंतीचे असते. योग्य मार्गदर्शनाशिवाय ते समजणे अवघड असते. जर कोअर बँकिंग प्रणालीबाबत अज्ञान असेल तर ती प्रभावीपणे राबविता येत नाही. कोअर बँकिंगचे व्यवस्थापन परिणामकारक असणे आवश्यक असते.

**बँकिंग क्षेत्रातील नवीन उपक्रम (Innovation in Banking Sector)-**

नविन तंत्रज्ञानामुळे बँकांच्या व्यवहारात क्रांतीकारी बदल घडून येत आहे. ई-बँकिंग अंतर्गत विविध प्रकारच्या सुविधा पुरविल्या जातात. त्या पुढीलप्रमाणे

**१) स्वयंचलित चलन आदान प्रदान यंत्र (A.T.M.-Automated Teller Machine)-**

संगणकाद्वारे ग्राहकांना अधिकाअधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने आणि मानवी शक्तीचा कमीत कमी वापर करुन स्वयंचलित यंत्राच्या सहाय्याने ग्राहकांना तत्पर सेवा पुरवून त्यांना आकर्षित करण्याची चढाओढ सर्व बँकांमध्ये सुरु झाली आहे. बँकांनी सुरु केलेली ए.टी.एम. सेवा ही त्यापैकीच एक सुविधा आहे. ए.टी.एम. म्हणजे Automated Teller Machine होय. ए.टी.एम. ला मराठीत ‘स्वयंचलीत गणक यंत्र’ असेही म्हणतात. ए.टी.एम. हे चलन मोजण्याचे, स्विकारण्याचे आणि देण्याचे स्वयंचलित यंत्र आहे. ग्राहकांना त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या बँक खात्यातील पैसे देणे व ग्राहकाची रक्कम त्याच्या खात्यात जमा करुन घेणे ही प्रक्रिया चोवीस तास करणारे यंत्र म्हणजे ए.टी. एम. होय. ग्राहकांच्या सोयीच्या उद्देशाने आपले पैसे केव्हाही मिळावेत यासाठी मुख्य रस्ते, बाजारपेठा, मॉल, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी बँका ए.टी.एम. केन्द्रे चालवितानां दिसून येतात.

ए.टी.एम. ची सुविधा प्राप्त करण्यासाठी ग्राहकाला बँकेकडे अर्ज करावा लागतो. आवश्यक त्या बाबींची पूर्तता केल्यानंतर संबंधीत ग्राहकाला बँक ए.टी.एम. सभासदत्व देते तसेच ग्राहकाला ए.टी.एम. कार्ड देते. या कार्डवर बँकेचे नाव, ग्राहकाचे नाव, कार्डच्या मागील बाजूस कार्ड धारकाची सही व काही सुचना दिलेल्या असतात. प्रत्येक ए.टी.एम. कार्डला बँक सांकेतिक क्रमांक देते व हा सांकेतिक क्रमांक कार्डधारकाने गोपनिय ठेवायचा असतो. या नंबरमुळे ग्राहकाची ओळख पटते. हे कार्ड ए.टी.एम. मशिनमध्ये टाकून ग्राहकांना त्यांचा आयडेंटिफिकेशन नंबर टाईप करावा लागतो. ए.टी.एम. मशिनला एक व्हिडिओ पडदा असतो, त्याच प्रमाणे रोख रकमेसाठी एक जागा असते जेथून आदेश दिल्याप्रमाणे नोटा बाहेर येतात.

**फायदे**

१) ए.टी.एम. मधून सर्वकाळ पैसे काढण्याची सोय असल्यामुळे ग्राहकाला स्वत:जवळ रोख रक्कम बाळगण्याची आवश्यकता नसते.

२) ग्राहकाला विनाविलंब सेवा प्राप्त होते.

३) ए.टी.एम. इंटर बँक नेटवर्कशी जोडले असल्यामुळे नेटवर्कच्या माध्यमातून ज्या बँकेचे ए.टी.एम. आहे त्या बँकेत खाते नसतांना देखील ग्राहकाला आपल्या बँकेच्या खात्यातून पैसे काढण्याची सोय असते.

**दोष**

१) ए.टी.एम. चे कार्ड हरवल्यास व ते चुकीच्या व्यक्तीजवळ जर गेले तर त्याचे दुरुपयोग होऊ शकतात.

२) ए.टी.एम. मशीनमधून एका वेळी ठरवून दिलेल्या विशिष्ट मर्यादेइतकीच रक्कम काढता येते.

३) ए.टी.एम. हे आधुनिक तंत्र हे सुरक्षितता वाढविण्याबरोबर वेगवान सेवा देणारे असले तरी त्यातील कमतरता शोधून 'सायबर गुन्हे' सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढतात.

४) अंध, अपंग, वृद्ध, अशिक्षित व्यक्ती इत्यादींना ए.टी.एम. सुविधेचा लाभ घेता येत नाही.

**२) डेबिट कार्ड (Debit Card)-**

वस्तू व सेवा खरेदी करतांना पैसे चुकते करण्यासाठी रोख पैसे देण्याऐवजी दुसरा सोपा पर्याय म्हणजे डेबिट कार्ड पेमेंट करणे. डेबिट कार्ड वापरल्यानंतर डिपॉझीट अकाउंटमधून पैसे वजा होतात. तर क्रेडिट कार्डवर पैसे क्रेडिट वर वापरता येते. क्रेडिट कार्डपेक्षा डेबिट कार्डचा वापर अधिक प्रमाणात वाढला आहे.

**डेबिट कार्डचा अर्थ (Meaning of Debit Card)-**

डेबिट कार्डला मराठीत नावे पत्र म्हटले जाते. ज्या व्यक्तीचे बँकेत खाते आहे त्या व्यक्तीची पत लक्षात घेऊन बँका आपल्या ठेवीदारांना डेबिट कार्ड उपलब्ध करुन देतात. या कार्डच्या सहाय्याने व्यक्तीला आपल्या बँक खात्यावरील व्यवहार करता येतात व वस्तू व सेवांची खरेदी करता येते. कार्डधारक जेव्हा वस्तू व सेवांची खरेदी करतो त्या खरेदीच्या वेळी बँक खात्यातून खरेदीची रक्कम वजा होऊन ती विक्रेत्याच्या खात्यात जमा होते.

**डेबिट कार्डची व्याख्या (Definition of Debit Card)-**

डेबिट कार्ड म्हणजे "बँकेने आपल्या ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यात असणाऱ्या रकमेच्या वापरासाठी उपलब्ध करुन दिलेली सुविधा होय."

**डेबिट कार्डचे फायदे (Advantages of Debit Card)-**

१) डेबिट कार्ड धारक बँकेच्या कोणत्याही शाखेतून अथवा ए.टी.एम. केंद्रातून आपल्या खात्यातील पैसे काढू शकतो.

२) डेबिट कार्ड धारकाला स्वत:जवळ रोख रक्कम जवळ बाळगण्याची आवश्यकता नसते.

३) प्रवासात खरेदी करण्यासाठी आणि सेवा प्राप्त करण्यासाठी व प्रसंगी रोख रक्कम मिळविण्यासाठी डेबिट कार्ड जास्त सोयीचे होते.

४) डेबिट कार्ड संबंधित बँकेच्या देश-विदेशात शाखा असल्यामुळे बँक व्यवहाराची व्याप्ती वाढते.

५) विदेशात नोकरी करणाऱ्या आपल्या कुटूंबियांना स्वदेशात पैसे पाठविण्यासाठी डेबिट कार्डचा उपयोग होतो.

६) डेबिट कार्डच्या सहाय्याने विमाने, रेल्वेची तिकीटे बुक करता येतात.

**डेबिट कार्डचे दोष (Demerits of Debit Card)-**

१) डेबिट कार्डमुळे व्यक्ती कधी कधी अनावश्यक खरेदी करणास प्रवृत्त होतो.

२) निरक्षर व अंध व्यक्ती या कार्डचा वापर करु शकत नाही. कारण प्रत्येक व्यवहारात कार्ड धारकास सही करणे आवश्यक असते.

३) डेबिट कार्ड हरवल्यास, चोरी गेल्यास नुकसान होण्याची संभावना असते.

## ३) क्रेडिट कार्ड (Credit Card)-

आधुनिक काळातील बँक व्यवसायाच्या अनेक सुविधांपैकी एक सुविधा म्हणजे क्रेडिट कार्ड. बँका आपल्या ग्राहकांना एक विशिष्ट प्रकारचे प्लास्टिक कार्ड देतात.या कार्डद्वारे ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तू व सेवांची रक्कम देण्याची जबाबदारी बँका स्विकारतात. त्यामुळे ग्राहकांकडून कोणतीही किंमत वसूल न करता त्याला वस्तू उपलब्ध करुन दिल्या जातात.

## क्रेडिट कार्डचा अर्थ (Meaning of Credit Card)-

क्रेडिट कार्ड पद्धती म्हणजे ग्राहक आणि क्रेडिट कार्ड देणारी बँक यांच्यातील पत व्यवस्था होय. क्रेडिट कार्डचा मराठीतील अर्थ पतपत्र असा होतो. क्रेडिट कार्डची सेवा ग्राहकांना उपलब्ध करुन देतांना बँक वर्षातून एकदाच फी घेत असते. क्रेडिट कार्डच्या व्यवहारात बँका विक्रेत्याकडून बिलाच्या विशिष्ट दराने कमिशन मिळवते. क्रेडिट कार्ड धारकाला रोख रकमेची आवश्यकता भासल्यास संबंधीत बँकेच्या कोणत्याही बँक शाखेतून विशिष्ट रक्कम उचल घेण्याची सोय क्रेडिट कार्ड धारकास असते.

**व्याख्या -** "बँकेने आपल्या ग्राहकांना विशिष्ट रकमेपर्यंतची खरेदी किंवा कर्जरकमेवरील उचल करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला विशिष्ट सांकेतिक क्रमांक असलेले प्लास्टिक कार्ड म्हणजे पतपत्र किंवा क्रेडिट कार्ड होय."

व्यापारी बँका आपल्या ग्राहकांना क्रेडिट कार्ड उपलब्ध करुन देण्याच्या कार्यपद्धतीत ग्राहकांना बँकेकडे विशिष्ट नमुन्यातील अर्ज करावा लागतो. व्यक्तीचे उत्पन्न व त्याची पात्रता इत्यादी तपासून विशिष्ट शुल्क आकारुन बँका ग्राहकांना विशिष्ट सांकेतिक क्रमांक

असणारे प्लास्टिकचे कार्ड उपलब्ध करुन देतात. या कार्डवर बँकेचे नाव, क्रेडिट कार्ड धारकाचे नाव, सांकेतिक क्रमांक, क्रेडिट कार्डची मुदत संपण्याची तारीख, क्रेडिट कार्ड धारकाची स्वाक्षरी इत्यादी तपशील दिलेला असतो. क्रेडीट कार्डची व्यवस्था ही त्रि-पक्षीय असते त्यात १) क्रेडिट कार्ड देणारी बँक २) क्रेडिट कार्ड धारक ३) यात सहभागी होणारी व्यवसायिक संस्था.

या क्रेडिट कार्डची मुदत २ वर्षाची असते. दोनवर्षानंतर नवीन कार्ड करावे लागते. क्रेडिट कार्ड देतांना कार्ड धारकाने किती रक्कम काढावी यावर बँक मर्यादा घालून देते. क्रेडिट कार्ड धारकाने क्रेडिट कार्डच्या सहाय्याने वापरलेली रक्कम विशिष्ट मुदतीत बँकेकडे व्याजासहित परत करावी लागते. ही वापरलेली रक्कम न फेडल्यास बँक क्रेडिट कार्डची सेवा त्वरीत बंद करु शकते. प्रत्येक महिन्याच्या शेवटी बँक क्रेडिट कार्ड धारण करणाऱ्या ग्राहकाला कार्डच्या आधारावर केलेल्या खरेदीचे तपशील दर्शविणारे विवरण पाठविते.

**क्रेडिट कार्डचे गुण (Merits of Credit Card)-**

१) ग्राहकाला प्रत्येक वेळी रोख रक्कम जवळ बाळगण्याऐवजी केवळ क्रेडिट कार्ड बाळगल्यास सर्व व्यवहार पूर्ण करता येतात.

२) देश-विदेशातील कोणत्याही ठिकाणी वस्तू व सेवांची खरेदी करणे क्रेडिट कार्ड धारकाला शक्य होते.

३) क्रेडिट कार्डमुळे ऑनलाईन खरेदीचे व्यवहार अत्यंत सुलभ होतात.

४) क्रेडिट कार्डच्या व्यवहारामुळे बाजाराची व्याप्ती वाढते.

५) क्रेडिट कार्डमुळे बँकांना दुहेरी उत्पन्न प्राप्त होते. १. क्रेडिट कार्ड धारकाकडून वार्षिक फी २. विक्रेत्याकडून कमिशन.

**क्रेडिट कार्डचे दोष (Demerits of Credit Card)-**

१) क्रेडिट कार्डमुळे ग्राहकाला व उधारीच्या खरेदीची सवय लागते.

२) व्याजाचा दर जास्त असल्याने बँकेने दिलेल्या मुदतीच्या आत पैसे न भरल्यास ग्राहकाला जास्त पैसे भरावे लागतात.

३) बँकांना बऱ्याच वेळा ग्राहकाकडून पैसे वसूल न करता आल्यास कर्ज बुडण्याची शक्यता असते.

**४) प्लास्टिक कार्ड (Plastic Card)-**

प्लास्टिक कार्डमध्ये असलेल्या रकमेच्या आधारावर उधारीने विकत घेण्यासाठी असलेले कार्ड तसेच जमा खर्चातील खर्चाच्या बाजूकडील नोंद देणारे (पत्रक) कार्ड आहे. हे कार्ड ग्राहकाला अधिकोषामार्फत दिले जाते. या कार्डचा उपयोग ग्राहक वस्तू आणि सेवांचे देणे फेडण्यासाठी करतात. या कार्डमुळे ग्राहकाला रोख रक्कम जवळ बाळगण्याची गरज नसते त्याकरिता अधिकोष मोठमोठे मॉल यांच्याशी करार आणि व्यवस्था करुन ग्राहकाच्या गरजा पूर्ण करते. मोठमोठे मॉल आपला पैसा अधिकोषाकडून वसूल करतात. ग्राहकही तो पैसा अधिकोषात जमा करतो.

**५) स्मार्ट कार्ड (Smart Card)-**

स्मार्ट कार्ड हे क्रेडिट कार्ड सारखचे आहे. या कार्डमध्ये एक चीप असते ज्यात माहिती साठवून ठेवण्याची व्यवस्था असते. चुंबकीय पट्टीपेक्षा या चीपमध्ये साठवलेली माहिती स्थायी स्वरुपाची असते किंवा त्यात आवश्यकता वाटल्यास बदलही करता येतो. उदा. - पासवर्डमध्ये बदल.

स्मार्ट कार्डचा उपयोग बहुविध कामांसाठी केला जातो. उदा. - ओळख पत्र, स्वास्थ कार्ड, ड्रायव्हिंग लायसेंस इत्यादी. या स्मार्ट कार्डचा उपयोग दिवसेंनदिवस वाढत आहे.

### ६) चेक गॅरंटी कार्ड (Cheque Guarantee Card)-

चेक गॅरंटी कार्ड हे सुद्धा एक प्रकारचे प्लास्टिक कार्ड व पतपत्र आहे. हे कार्ड अधिकोष आपल्या ग्राहकाला धनादेशासोबत देत असते. ज्या अधिकोषाला धनादेश द्यावयाचा आहे ती व्यक्ती तो कार्ड नंबर धनादेशाच्या मागे लिहून घेते. अधिकोष धनादेशावरील सही व कार्डवरील सही तपासून घेतो. त्यामुळे धनादेशावरील रक्कम देण्यास अधिकोषाला कोणताही अडथळा येत नाही. डेबिट कार्ड व क्रेडिट कार्डचा वापर वाढल्यामुळे इ.स. २००० नंतर या कार्डचा वापर बंद झाला. २०११ ला ही योजना पूर्णपणे बंद झाली.

### ७) ई-पर्स (E-Purse)-

ई-पर्स म्हणजे इलेक्ट्रॉनिक पर्स. आधुनिक मौद्रिक अर्थव्यवस्थेतील पैशाचे शोधन करण्याचे साधन. ई-पर्सच्या वापरामुळे आजच्या इलेक्ट्रॉनिक युगात व्यवहार करण्यासाठी रोख रक्कम जवळ बाळगण्याची गरज नसते. रोख रकमेऐवजी वापरण्यात येणाऱ्या साधनाला ई-पर्स म्हणतात. यालाच डिजीटल नगद पैसा असेही म्हणतात. यात पैशाचे व्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमाने केले जातात. ई-पर्सचा वापर ग्राहक व व्यापाऱ्यांना सुरक्षित व उपयुक्त आहे. ई-पर्सचा वापर ग्राहकांना अत्यंत सोईचा झालेला आहे.

थोडक्यात इलेक्ट्रॉनिक पर्स (ई-पर्स) हे ई-बँकिंग व्यवहारातील विपणनाच्या व्यवहारांकरिता वापरण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक साधन आहे ज्याचा उपयोग प्रवासासाठी पैसे देण्यासाठी किंवा इतर लहान प्रमाणावरील व्यवहारांसाठी ही करता येतो. ई-पर्सच्या सहाय्याने वस्तूची मूळ रक्कम देता येते म्हणजे मोजक्या पैशाचे शोधन करता येते. ई-पर्स हे स्मार्ट कार्डमधील एका विशिष्ट क्षेत्रात किंवा फाईलमधील सुरक्षित माहिती आहे.

अधिकोष आपल्या ग्राहकांना पैशाचा संग्रहण असेलेले एक कार्ड देते. या कार्डमध्ये त्या ग्राहकाच्या खात्यातील रक्कम स्थानांतरीत होत असते. या कार्डचा उपयोग ग्राहक त्याला पाहिजे त्या वेळी करु शकतो. ATM ग्राहकाचा वैयक्तिक संगणक, मोबाईल फोन इत्यादींच्या सहाय्याने वापर करु शकतो. इलेक्ट्रॉनिक पर्स (ई-पर्स) हे ATM Card प्रमाणे कार्य करते.

**स्वयंचलीत समाशोधन गृह (Automated Clearing House)-**

प्रत्येक केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांसाठी समाशोधन गृहाची निर्मिती करत असते. ग्राहकांनी आपल्या बँकेवर काढलेले चेक दुसऱ्या बँकेत जमा केल्यास दोन बँकामध्ये परस्पर देण्या-घेण्याचे व्यवहार निर्माण होतात. ही देणी-घेणी समायोजित करण्याचे महत्वाचे कार्य रिझर्व्ह बँक करत असते. देशाच्या सर्व बँकाचे खाते रिझर्व्ह बँकेत असल्यामुळे समाशोधनाचे कार्य सहजतेने केले जाते. ई-बँकिंगमुळे पारंपारिक समाशोधनाची कार्यपद्धती बदलून त्याची जागा ऑनलाईन समाशोधनाने घेतली. रिझर्व्ह बँकेचे समाशोधन गृह हे सुद्धा स्वयंचलित स्वरुपाचे झाले आहे. त्यामुळेच समाशोधन गृहाला स्वयंचलीत समाशोधन गृह असे म्हणतात.

**ऑनलाईन बँकिंग (Online Banking)-**

बँकेचे ग्राहक बँकेत चेक जमा करणे, एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पैसे हस्तांतरीत करणे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठविणे, ए.टी.एम. मधून पैसे काढणे, विजेचे बिल, टेलीफोन बील भरणे, ग्राहकाच्या खात्यात पगार, निवृती वेतन जमा करणे इत्यादी शोधन ई-बँकिंगच्या सहाय्याने केली जातात. यालाच ऑनलाईन बँकिंग असे म्हणतात. ऑनलाईन बँकिंगमुळे एका बँकेचा दुसऱ्या बँकेशी लवकरात लवकर व कमी खर्चात व्यवहार होतात. संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन व्यवहार केले जातात.

भारतात ऑनलाईन समाशोधन गृहाची सोय २००५ मध्ये रिझर्व्ह बँकेने आपल्या ग्राहकांसाठी केली आहे.

ऑनलाईन समाशोधन गृह समाशोधन कार्याची ऑनलाईन सेवा आहे. ही सुविधा प्राप्त करुन घेणाऱ्याला केंद्रिय बँकेच्या कोणत्याही शाखेशी सलग्न व्हावे लागते. रिझर्व्ह बँकेंच्या शाखेकडे एका विशिष्ट नमुन्यात अर्ज करुन विशिष्ट रक्कम जमा करुन हा अर्ज रिझर्व्ह बँकेच्या कार्यालयात सादर करावा लागतो. रिझर्व्ह बँक अर्जाची तपासणी करुन अर्जदाराने विनंती केलेल्या शाखेत त्याच्या नावाने स्वतंत्र्य समाशोधन खाते उघडले जाते. त्यानंतर समाशोधन सेवेचे सभासदस्व असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. त्यानंतर अर्जदार आपल्या बँकेच्या कार्यालयातून समाशोधनाचे कार्य करु शकतो.

**आधुनिक लेजर पोस्टींग मशीन (Advanced Ledger Posting Machine)-**

पारंपारीक पद्धतीनुसार बँकेतील दैनंदिन व्यवहाराची नोंद ठेवण्यासाठी लेजर रजिस्टरचा वापर करण्यात येत असे. ऑनलाईन बँकिंग आणि नेट बँकिंगमुळे लेजर रजिस्टरचा वापर अशक्य होऊ लागले. नेट बँकिंगसाठी खातेदाराला त्याचा लेजर पोस्टींग क्रमांक माहित असणे आवश्यक असते. त्यामुळे संगणकाच्या सहाय्याने सॉफ्टवेअरचा वापर करुन लेजर पोस्टींग करण्यात येऊ लागले.

ज्या संगणकीय कार्यपद्धतीद्वारे हे लेजर पोस्टींग केले जाते त्याला अॅडव्हान्स लेजर पोस्टींग मशीन असे म्हणतात हे एक व्यावसायिक यंत्र असून व्यवसायाच्या अशाच प्रकारच्या इतर प्रक्रियांच्या नोंदी ठेवणे, यात बँकेतील चालू जमा आणि खर्च ह्यांची बेरीज करुन त्यांची नोंद ठेवणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. या मशीनचा वापर करुन कोअर बँकिंग अस्तित्वात आणता येते. या मशीनच्या वापरामुळे खातेदाराला त्याचे खाते केव्हाही वापरता येते. या मशीनच्या वापरामुळे ऑनलाईन बँकिंग सेवा रात्री सुद्धा उपलब्ध करुन देता

येते. या मशीनच्या वापरामुळे खातेपुस्तकांची देखभाल, व्याजाची रक्कम काढणे, इत्यादी कामांच्या नोंदी अचूक व कमी वेळात होतात.

अशा प्रकारे ऑनलाईन बँकिंगचे व्यवहार करण्यासाठी ॲडव्हान्स लेजर पोस्टींग मशीन अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडते.

**एम. आय. सी. आर. (MICR- Magnetic Ink Character Recognition)-**

हे एक आधुनिक विकसित असलेले तंत्रज्ञान आहे. याचा वापर अधिकोष प्रामुख्याने धनादेश समाशोधनासाठी करतात. एम. आय. सी. आर. ही पद्धती म्हणजे चुंबकीय शाईवरुन चेकची वैशिष्ट्ये ओळखणे होय.

धनादेशाच्या खालच्या बाजूस प्रदायी बँकेचा आय. एफ. एस. सी. (IFSC) नंबर चेकवरील एम. आय. सी. आर. (MICR) नंबर, चेक नंबर, चेकची राशी, आदात्याचे नाव ही माहिती दिलेली असते. ही माहिती स्वयंचलीत इलेक्ट्रॉनिक प्रणालीला दिल्याबरोबर चेकचे संपूर्ण प्रतिबिंब प्रदायी बँकेला पोचविले जाते. या इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या सहाय्याने आवश्यक त्या सर्व नोंदी होऊन चेकच्या राशीचे शोधन केले जाते. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत कमी वेळात पूर्ण होते.

थोडक्यात एम. आय. सी. आर. तंत्रज्ञानाचा वापर कागदपत्रांची वैधता तपासण्यासाठी एका विशिष्ट प्रकारच्या शाईचा वापर करुन करण्यात येतो. ही शाई चुबकीय क्षेत्रांसाठी संवेदनशील असते.

**धनादेश शोधन (Cheque Clearing)-**

व्यापारी व उद्योगपती तसेच इतर ग्राहक देणी फेडण्यासाठी आपल्या अधिकोषावर धनादेश काढून शोधन करतात व हे धनादेश ते आपल्या अधिकोषात जमा करतात.

धनादेशाच्या वाढत्या वापरामुळे अधिकोषात फार मोठ्या प्रमाणात देयता निर्माण होते. ही देय रक्कम रोख स्वरुपात देण्याऐवजी समाशोधन गृहामार्फत देणी-घेणी यांची वजावट केली जाते. त्यामुळे बँकांना रोकड द्यावी लागत नाही. समाशोधन गृह अधिकोषाची अशी शाखा होय की जिच्यामार्फत धनादेशाची पारस्परिक देणी समायोजन करुन फेडता येते.

**समाशोधन गृहचे दोन प्रकार आहेत.**

**१) आंतरशाखा समाशोधन -** एकाच प्रकारच्या अधिकोषाच्या वेगवेगळ्या शाखांवर काढलेल्या धनादेशांचे प्रतिसाद करणे.

**२) आंतर अधिकोष प्रतिसाद -** एकाच ठिकाणच्या निरनिराळ्या अधिकोषांवर काढलेल्या धनादेशांच्या व्यवहारातून निर्माण होणारी देणी फेडण्यात येतात. हे प्रामुख्याने केंद्रिय अधिकोषात असते.

थोडक्यात समाशोधन गृहाचा मुख्य उद्देश धनादेशामुळे निर्माण होणाऱ्या परस्परांवरील देण्याचा प्रतिसाद करणे होय.

**इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण (Electronic Fund Transfer - EFT)-**

इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरमुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या सहाय्याने निधींचे त्वरीत हस्तांतरण होऊ शकते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९९४ साली स्थापन केलेल्या सराफ समितीने आदान-प्रदान प्रणालीतील तंत्रज्ञान विषयक बाबींवर दिलेल्या शिफारशीनुसार ही पद्धती सुरु करण्यात आली.

चेक, ड्रॉफ्ट, किंवा तत्सम दस्तऐवजांच्या साधनांऐवजी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, टेलिफोन, संगणक किंवा संगणक चुंबकीय फित यांच्या आधारे निधीचे बँकेला सुचना देऊन खात्यातून काढणे किंवा जमा करण्याचे अधिकार देणे होय.

या माध्यमांमुळे अनावश्यक कागदी खर्च कमी करण्यास मदत होते. हे यंत्र ग्राहकाच्या वतीने अधिकोषाला आदेश देते. आपला निधी विशिष्ट बँकेत जमा करण्यासाठी किंवा विशिष्ट व्यक्तीला, संस्थेला देण्यासाठी, अर्थात EFT हे दोन व्यक्ती किंवा दोन संस्थामधील देवाण-घेवाण करण्यासाठी प्रत्यक्ष रोख रकमेचा वापर न करता करता येतो. इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण पद्धतीत रकमेचे हस्तांतरण करण्यासाठी संगणक किंवा टेलीफोनचा उपयोग केला जातो.

इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण क्रेडिट कार्ड, स्मार्ट कार्ड, डेबिट कार्ड, इलेक्ट्रॉनिक चेक, इलेक्ट्रॉनिक कॅश, डिजीटल पर्स इत्यादी साधनांचा वापर करुन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निधीचे हस्तांतरण केले जाऊ शकते. इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण पद्धतीच्या अंतर्गत लायसन्स फी देखील सोबतच भरल्या जाते. त्यासाठी ग्राहकाला डी.डी. काढण्याची आवश्यकता नसते त्यामुळे ग्राहकाला अधिकोषात जाण्याची गरज भासत नाही व ग्राहकाचा वेळ सुद्धा वाचतो.

**इंटरनेट बँकिंग (Internet Banking)-**

इंटरनेट बँकिंग म्हणजे वैयक्तिक संगणकामार्फत विविध प्रकारचे अधिकोषाचे व्यवहार सुलभतेने घडवून आणणारी प्रणाली म्हणजे 'इंटरनेट बँकिंग' होय. या प्रणालीत संगणक किंवा लॅपटॉप थेट अधिकोषाशी जोडता येतो. या प्रक्रियेत ग्राहकाचा थेट अधिकोषाशी संपर्क साधला जातो. इंटरनेटच्या वापरामुळे बँकिंग व्यवहार तत्परतेने व गुप्तता राखून केले जातात. ग्राहकाला बाहेरगावी गेलेले असतांना सुद्धा बँकेचे व्यवहार करता येतात. इंटरनेट बँकिंगसाठी खातेदाराला बँकेच्या वेब साईटला भेट द्यावी लागते. तो त्या वेब साईटला त्याच्या युजरनेम व पासवर्डच्या सहाय्याने लॉगऑन करतो. त्यावेळी वेगवेगळ्या सेवांचे पर्याय त्याठिकाणी दिसू लागतात. त्यावेळी ग्राहकाला आवश्यक असणाऱ्या सुविधेचा अर्ज दिसल्यानंतर तो

ऑनलाईन अर्ज करुन ई-मेलद्वारे बँकेला पाठवितो. त्यासाठी योग्य ती कारवाई करुन त्याचे उत्तर पुन्हा ई-मेलद्वार बँक ग्राहकाला पाठविते.

इंटरनेट बँकिंगद्वारे ग्राहकाला अनेक सुविधा प्राप्त होतात. जसे - ग्राहकाला त्याच्या खात्यावरील रक्कम माहित होते. त्याने दिलेले चेक कोणत्या स्थितीत आहे हे पाहता येते. चेक बुक संपल्यास ते मागविता येते. ग्राहक आपल्या आवश्यकतेनुसार केव्हाही व्यवहार करु शकतो, इंटरनेट सुविधा ही ग्राहकासाठी अत्यंत प्रभावी व कार्यक्षम यंत्रणा आहे. इंटरनेट बँकिंगमुळे बँक व ग्राहक यांच्यात प्रत्यक्ष संपर्क न येताही चांगले संबंध प्रस्थापित होतात.

**इलेक्ट्रॉनिक चेक (Electronic Cheque)-**

इंटरनेटच्या माध्यमातून विजेचे बिल, टेलिफोनचे बील भरता येतात तसेच कुठल्याही व्यवहाराचे देणी फेडता येते. या पद्धतीला Electronic Cheque असे म्हणतात Electronic Cheque हा पारंपारिक चेकपेक्षा जास्त सुरक्षित असतात. ह्यात प्रामुख्याने एका खात्यातून दुसऱ्या खात्यात पैसे पाठविता येतात. E-Cheque चा वापर Online Payments करण्यासाठी केला जातो. हे व्यवहार प्रामुख्याने उद्योग व व्यापाराशी निगडीत असतात. पारंपारीक कागदी चेकपेक्षा E-Cheque चा खर्च कमी असतो. E-Cheque ची प्रक्रिया पारंपारीक कागदी चेकपेक्षा जास्त जलद गतीने होते.

**इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा (Electronic Clearing Services - ECS)-**

ज्या व्यवहारांचे स्वरुप पुन:पुन्हा घडणारे आणि आवर्ती असतात अशा इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणासाठी ई. सी. एस. चा उपयोग केला जातो. बँका त्यांच्या भाग धारकांना व्याज व लाभांश वाटप करतात. अशा भाग धारकांची संख्या मोठी असते. अशा वेळेस बँका या पद्धतीचा वापर करतात. मोठ मोठ्या कंपन्या तसेच उद्योग व्यवसाय त्यांच्या

कर्मचाऱ्यांचे वेतन, पेन्शन वाटप करण्यासाठी तसेच टेलीफोन, बीज, पाणी इ. बिले तसेच करांच्या रकमा गोळा करणे, ठराविक कालावधीनंतर म्युच्युअल फंडात रकमा भरणे यासाठी या पद्धतीचा उपयोग होतो.

ECS चे दोन प्रकार पडतात

१) ECS क्रेडिट

२) ECS डेबिट

**१) ECS क्रेडिट -**

मोठ्या प्रमाणावरील लाभार्थी, ज्यांचे बँकेच्या विविध ठिकाणी, विविध शाखांमध्ये खाती असतील आणि ज्या बँक शाखा ECS केंद्राच्या अधिकार कक्षेत असेल अशा ठिकाणी क्रेडिट करण्यासाठी (खाती जमा करण्यासाठी) ECS क्रेडिटचा वापर केला जातो. या प्रकाराचा उपयोग लाभांश, व्याज, वेतन, पेंशन इत्यादीच्या वितरणासाठी केला जातो.

**२) ECS डेबिट -**

एखाद्या ECS केंद्राच्या अधिकार कक्षेतील निरनिराळ्या ठिकाणी स्थित असणाऱ्या बँकांच्या शाखांमध्ये अनेक खाती असणाऱ्यांसाठी ECS डेबिट चा उपयोग केला जातो. ECS डेबिट हे टेलीफोन, विज बिल, पाणी बिल, कर्जाचा हप्ता भरणे या सारख्या सातत्याने कराव्या लागणाऱ्या भरण्यासाठी उपयुक्त ठरते.

ज्या अधिकोषात ECS ची सेवा उपलब्ध आहे त्या अधिकोषाला अधिकृत अनुमोदन करणारा असे म्हटले जाते. ज्यांना नेहमी नियमित प्रमाणात अधिकोषाला किंवा वित्तीय संस्थेला असे देणे द्यावयाचे असते तिला अंतिम संस्था (Destination Bank) असे म्हटले जाते. भारतीय रिझर्व्ह बँकेने २००५ मध्ये ECS प्रणाली भारतीय ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिली. या प्रणालीत सर्व व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होत असल्यामुळे कागद,

प्रशासकीय खर्च व इतर खर्चात कपात होते. ECS प्रणाली म्हणजे फसवणुकीपासून सरंक्षण, सोपी प्रक्रिया अशा प्रकारचे फायदे मिळतात.

**डिमॅट खाते (Demat Account)-**

डिमॅट अकाउँट म्हणजे आपण खरेदी केलेल्या आणि विक्री केलेल्या शेअर्सचा हिशोब ठेवणारा अकाउँट दुसऱ्या अर्थाने सांगावयाचे झाल्यास शेअर्सची कागदपत्रे भौतिक स्वरुपात न बाळगता ती कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सांभाळणे म्हणजे डिमॅट असा अर्थ अभिप्रेत आहे.

पूर्वी रोखे, शेअर्स इत्यादी कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होत असते. अशी कागदपत्रे हरवण्याचा, चोरीला जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या व्यवहारात अडचणी निर्माण होतात. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी सेबीने १९९६ मध्ये डिमॅट सेवा सुरु केली. म्हणजे यात पेपर विरहित व्यवहार होतात. या पेपर विरहित व्यवहारांची प्रक्रिया म्हणजे डिमॅट.

गुंतवणूकदाराला प्राथमिक बाजारात गुंतवणूक करावयाची झाल्यास त्याला अर्जासोबत डिमॅट क्रमांक द्यावा लागतो. डिमॅट खाते हे कोणत्याही बँकेत किंवा वित्तीय संस्थेत उघडण्यात येते. आज बऱ्याचशा बँकांनी डिमॅट सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. उदा - कर्नाटक बँक, स्टॉक होल्डींग कार्पोरेशन लिमिटेड, खाजगी बँका, सहकारी बँकासुद्धा ही सेवा उपलब्ध करुन देतात. जानेवारी १९९९ पासून छोट्या गुंतवणूकदारांना शेअर्स, डिमॅट करुन घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. आज १०,००० पेक्षा जास्त कंपन्यांनी डिमॅट केले आहे.

**डिमॅटचे फायदे (Advantages of Demat)-**

**१) भाग हस्तांतरण सुलभ होते -** या खात्याद्वारे पुस्तकी नोंद करुन प्रतिभूतिच्या हस्तांतरणाचे शोधन करुन भागांचे हस्तांतरण केले जाते.

**२) कागदपत्रे सांभाळावी लागत नाही -** यामध्ये सर्व व्यवहारांची नोंद ही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होत असते त्यामुळे कागदपत्रे सांभाळावी लागत नाही.

**३) खर्चात कपात -** डिमॅट खात्यामुळे भागांच्या हस्तांतरणाच्या खर्चात कपात झाली आहे तसेच डिमॅट खाती सांभाळण्याकरिता येणाऱ्या खर्चाचा भागही गुंतवणूकदाराला स्विकारावा लागत नाही. लाभांश वितरण, बोनस भागाचे निर्गमन इत्यादी कार्ये कमी वेळात व कमी खर्चात होतात.

**४) फसवणूक होत नाही -** डिमॅट खात्याच्या सहाय्याने भाग रोख्यांची खरेदी विक्री झाली तर गुंतवणूकदारांची फसवणूक होत नाही

**५) पारदर्शक व्यवहार -** डिमॅट खात्याद्वारे होणारे व्यवहार पारदर्शक असतात. ग्राहक इलेक्ट्रॉनिक माध्यमाने होणाऱ्या या व्यवहारांना स्वत: पाहू शकतो.

**६) शेअर्सचे हस्तांतरण -** डिमॅट खात्याद्वारे केवळ पुस्तकी नोंदी करुन प्रतिभूतिंच्या हस्तांतरणासंदर्भात शोधन करुन भागांचे हस्तांतरण केले जाते.

**७) नि:शुल्क हस्तांतरण -** डिमॅट खात्याद्वारे होणाऱ्या भागांच्या हस्तांतरणाच्या खर्चात कपात झाली आहे. डिमॅटच्या सहाय्याने भागांचे हस्तांतरण केल्यास त्यावर मुद्रांक शुल्क भरावे लागत नाही.

**८) कर्जाची उपलब्धता -** डिमॅट खातेदाराला डिमॅट खात्यातील प्रतिभूती तारणावर सहज कर्ज मिळू शकते.

**९) लहान गुंतवणूकदारांना लाभदायक -** डिमॅट खात्याद्वारे कोणत्याही प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीसाठी किमान मर्यादा नसल्याने अगदी एका समभागाची देखील ग्राहक खरेदी करु शकतो.

**१०) तरलता -** डिपॉझीटरीतील व्यवहाराची नोंद सात दिवसांच्या आत गुंतवणूकदाराच्या डिमॅट खात्यावर केली जाते.

**डिमॅट प्रतिभूतीची खरेदी आणि विक्री (Buying and Selling of Demat Securities)-**

डिमॅट प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीची कार्यपद्धती पुढील प्रमाणे

**१) डिमॅट खाते उघडणे -** गुंतवणूकदाराला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने समभागाची खरेदी करावयाची असेल तर त्याला सर्वप्रथम एखाद्या डिपॉझीटरी (निक्षेपस्थान) पार्टीसीपंट (भागीदार, सहभागी) (DP) खाते उघडावे लागते. हे खाते म्हणजे डिमॅट खाते. १९५९ च्या कंपनी कायद्यानुसार कंपनीचे भाग धारण करण्यास पात्र असणारी कोणतीत्याही व्यक्तीला DP मध्ये खाते उघडता येते. खाते उघडतांना गुंतवणूकदाराला आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. त्यासाठी अर्ज व DP ने प्रमाणित केलेले करारपत्र योग्य मुद्रांक शुल्क लावून सह्या करुन देणे आवश्यक आहे.

**डिमॅट खाते उघडतांना गुंतवणूकदाराला पुढील बाबींची पूर्तता करावी लागते.**

१) खाते उघडण्याचा फॉर्म

२) डी. पी ने प्रमाणित केलेले करारपत्र

३) पॅनकार्ड

४) पासपोर्ट साईज दोन रंगीत फोटो

५) खातेदाराची ओळख पटविणारी कागदपत्रे

६) खातेदार राहात असलेल्या ठिकाणचा प्रमाणपत्र उदा - इलेक्ट्रीक बिल, टेलिफोन बिल.

७) बँक स्टेटमेंट (विवरण)

८) खातेदाराच्या बँकचेकची झेरॉक्स प्रत

९) खातेदाराला ओळखणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तीचे पत्र

१०) इतर आवश्यक कागदपत्रे

वरील सर्व कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर डी.पी. गुंतवणूकदाराला डिमॅट खाते उघडण्यास परवानगी देते. त्यानंतर गुंतवणूकदाराला डी.पी. कडून पासबुक दिले जाते. गुंतवणूकदाराच्या सर्व व्यवहारांचा तपशील या खात्यात असतो. खातेदार डिमॅट खात्यासाठी नॉमीनेशन करु शकतो.

### २) भाग व्यापार खाते -

गुंतवणूकदार ज्यावेळेस डिमॅट खाते उघडतो त्याच वेळी त्याच्या दलालाकडे भाग व्यापार खाते उघडले जाते. जर दलाल हाच डी. पी. असेल तर डिमॅट खाते व भाग व्यापार खाते एकाच ठिकाणी उघडले जाते. परंतु जर दलाल हा डी. पी. नसेल तर ही दोन्ही खाते वेगवेगळ्या ठिकाणी उघडली जातात. यानंतर ग्राहक आपल्या खात्यातील प्रतिभूतींचे हस्तांतरण करु शकतो.

### ३) प्रतिभूती खरेदीचा आदेश -

प्रतिभूतीचा बाजारातील दर इंटरनेटद्वारे समजतो. प्रतिभूतींची कुठल्या दराने खरेदी करावयाची याचा निर्णय स्वत: गुंतवणूकदारालाच द्यावा लागतो. जर बाजारातील प्रचलित दर जास्त असेल तरी गुंतवणूकदार कमी दराने खरेदी करण्याचे आदेश नोंदवू शकतो.

गुंतवणूकदाराने जो दर सांगीतला तेवढा दर झाला तर संबंधित प्रतिभूतींचे गुंतवणूकदाराला वाटप केले जाते आणि जर गुंतवणूकदाराने आदेश केलेला दर झाला नाही तर गुंतवणूकदाराला प्रतिभूती मिळणार नाही.

**४) करारपत्र प्राप्त करणे -**

गुंतवणूकदाराने दलालाला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रतिभूतिंच्या खरेदीचा आदेश दिल्याप्रमाणे दलाल त्या प्रतिभूतींची खरेदी करतो. या प्रतिभूती प्रथम दलालाच्या खात्यावर जमा होतात. त्यानंतर गुंतवणूकदाराला करार लेख प्राप्त झाल्यानंतर त्याच्या मार्फत खरेदी केलेल्या भागांचे पैसे दलालाच्या खात्यात जमा करावे लागतात.

**५. प्रतिभूती हस्तांतरण करणे -**

दलालाने गुंतवणूकदारासाठी खरेदी केलेल्या प्रतिभूती डिमॅट खात्यात जमा झालेले असतात. गुंतवणूकदार खरेदी केलेल्या समभागाची माहिती डिपीला देतो व त्या प्रतिभूती दलालाच्या खात्यातून त्याच्या खात्यात स्थानांतरीत करण्यास सांगतो. त्यानंतर गुंतवणूकदाराच्या खात्यावर त्या प्रतिभूती जमा होतात. गुंतवणूकदार व दलाल यांचा एक डि.पी. असल्याने वरील व्यवहार अत्यंत सहजरित्या पार पडतात.

**६. प्रतिभूतींची विक्री -**

डि.पी.मध्ये डिमॅट खात्याद्वारे गुंतवणूकदार आपल्या प्रतिभूतीची केव्हाही विक्री करु शकतो. ज्या व्यक्तीला हे विकण्यात येणार आहे त्या व्यक्तीचे कोणत्याही डि.पी.मध्ये डिमॅट खाते असणे आवश्यक असते. यानंतर प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहारानंतर त्यांची इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करारपूर्ती करण्याची जबाबदारी डिपॉझीटरवर असते. प्रतिभूतींची विक्री करणाऱ्या गुंतवणूकदारांने समभाग ते खरेदी करणाऱ्या गुंतवणूकदाराच्या खात्यात जमा

करावे लागतात. खरेदी करणारा गुंतवणूकदार विक्री करणाऱ्या गुंतवणूकदाराला समभागाच्या खरेदी रकमेइतका चेक दलालामार्फत प्राप्त होतो.

थोडक्यात डिमॅट खाते हे कागद विरहित व्यवहारांचे खाते होय. या खात्याच्या सहाय्याने प्रतिभूतींची खरेदी-विक्री करणे, प्रतिभूती बाळगणे सहज शक्य होते.

**भारतातील खाजगी क्षेत्रातील अधिकोष (Private Sector Banks in India)-**

भारतातील खाजगी अधिकोषांचे तिन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

**भारतातील खाजगी अधिकोष**

- खाजगी क्षेत्रातील जुने अधिकोष
- खाजगी क्षेत्रातील नवीन अधिकोष
- खाजगी स्थानिय क्षेत्रीय अधिकोष

**खाजगी क्षेत्रातील जुने अधिकोष -**

१९६९ व १९८० या दोन्ही वर्षी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या राष्ट्रीयीकरणात जवळ जवळ ९३ टक्के व्यापारी अधिकोष क्षेत्रातील लहान आकाराच्या व प्रादेशिक स्वरुपाच्या असल्याने त्यातील काही अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण झाले नाही. १९६९ पासून केंद्रिय अधिकोषाने खाजगी क्षेत्रात अधिकोष स्थापन करण्यासाठी परवाना देण्याचे धोरण बंद केले. त्यामुळे १९६९ पूर्वी स्थापन झालेल्या खाजगी अधिकोषांना जुने खाजगी अधिकोष असे म्हणले जाते. त्यातील काही महत्वाच्या अधिकोषांमध्ये, फेडरल बँक, वैश्य बँक, युनायटेड वेस्टर्न बँक, बँक ऑफ मदुरा, लक्ष्मी विलास बँक, कर्नाटक बँक, इत्यादी अधिकोषांचा भारतातील खाजगी क्षेत्रातील जुन्या अधिकोषांमध्ये समावेश होतो.

**२) खाजगी क्षेत्रातील नवीन अधिकोष -**

१९९१ च्या आर्थिक सुधारणा सुरु झाल्यानंतर स्थापन करण्यात आलेल्या वित्तीय क्षेत्र सुधारणा विषयक नरसिंहम समितीने अधिकोषण क्षेत्रावरील नियंत्रण दूर करण्याकरिता केलेल्या शिफारशीनुसार केंद्रिय अधिकोषाने जानेवारी १९९३ मध्ये खाजगी क्षेत्रातील अधिकोषांना नव्याने बँक प्रणालीत प्रवेश करण्याची संधी उपलब्ध झाली. नवीन अधिकोषांमध्ये यु. टी. आय. बँक, एच. डी. एफ. सी. बँक, आय. सी. आय. बँक, आय. डी. बी .आय. बँक, कोटक महिंद्रा बँक, येस बँक, इंड्सइंड बँक, इत्यादी बँकांचा समावेश होतो. खाजगी क्षेत्रात नवीन अधिकोष स्थापन करण्याच्या केंद्रिय अधिकोषांच्या जानेवारी १९९३ च्या मार्गदर्शक तत्वांमध्ये ३ जाने. २००१ ला केंद्रिय अधिकोषाने बदल घडवून आणले.

**३) खाजगी स्थानिय क्षेत्रीय अधिकोष -**

१९९६-९७ च्या अंदाजपत्रकात भारत सरकारने खाजगी स्थानिय क्षेत्रीय अधिकोष स्थापन करण्याचे धोरण जाहिर केले. या धोरणाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील लोकांकडून बचती गोळा करणे व या बचतींचा वापर स्थानिक भागातील लोकांना कर्ज देण्यासाठी करावा. या धोरणानुसार २४ ऑगस्ट १९९६ ला केंद्रिय अधिकोषाने असे अधिकोष स्थापन करण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक तत्वे सांगितली ती पुढील प्रमाणे.

अ) या अधिकोषाचे कार्यक्षेत्र सलग ३ जिल्ह्यांचे क्षेत्रफळ असेल.

ब) भाग भांडवल किमान ५ कोटी रु. असावे

क) भाग भांडवलापैकी व्यक्ती प्रमंडळे, विश्वस्त संस्था यांनी किमान २ कोटी रुपये द्यावे.

ड) स्थानिय क्षेत्रिय अधिकोष हे केंद्रिय अधिकोष कायदा १९३४, १९४९ व १९७६ च्या अंतर्गत राहिल.